# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
# (म्हाडाचा घटक)

**गिरणी संकेत क्रमांक, नावामधील दुरुस्ती व गिरणी कामगार/ वारसांनी केलेल्या दुबार अर्जापैकी कोणता अर्ज ग्राह्य धरावा याकरिता विनंती अर्ज सादर करण्याकरिता मुदतवाढ देणे बाबत.**

**जाहीर सूचना**

मुंबई मंडळाने गिरणी कामगार/ वारस यांची यादी म्हाडाचे संकेत स्थळ https://mhada.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर यादीमध्ये ज्या गिरणी कामगार/ वारसांनी दुबार अर्ज केले आहे त्यापैकी एक अर्ज ग्राह्य धरुन उर्वरीत अर्ज रद्द करणे, गिरणी संकेत क्रमांक बदल करणे, नावात दुरुस्ती करण्याकरिता मंडळाने दिनांक १९/१२/२०२२ ते दिनांक १७/०१/२०२३ या कालावधीमध्ये उपमुख्य अधिकारी (धापुप्र/गिरणी)/ मु.मं. कक्ष क्र.२०५, पहिला मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०००५१ या कार्यालयामध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून आवश्यक पुराव्यासह लेखी निवेदन सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

तथापी दुबार अर्जापैकी एक अर्ज ग्राह्य धरुन उर्वरीत अर्ज रद्द करण्याकरिता, गिरणी संकेत क्रमांक बदलाकरिता, नावात दुरुस्ती करण्याकरिता (कार्यालयीन दिवशी सकाळी ११.०० ते सायं.०५.०० यावेळेत) दिनांक १७/०२/२०२३ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर जाहिर सूचनेस गिरणी कामगार/वारसांचा प्रतिसाद बघता दुबार अर्जापैकी एक अर्ज ग्राह्य धरुन उर्वरीत अर्ज रद्द करण्याकरिता मूळ गिरणी कामगार अथवा त्यांचे वारसांनी आवश्यक पुरावे व ओळखपत्रासह लेखी निवेदन सादर राहण्याकरिता खाली नमूद कार्यालयामध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहणे बंधनकारक राहील. व गिरणी संकेत क्रमांक बदलाकरिता, नावात दुरुस्ती करण्याकरिता आवश्यक त्या पुराव्यासह लेखी निवेदन गिरणी कामगार/वारस अथवा नातेवाईकांना खालील नमूद विभागामध्ये सादर करण्यास मुभा देण्यात येत आहे.

| |
|---|
| गिरणी विभाग/ मु.मं. कक्ष क्र.२०५, पहिला मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०००५१. |

दिनांक १७/०२/२०२३ या दिनांकानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा या मोहिमेत समावेश करणे अथवा कोणत्याही बदलाबाबतची विनंती अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. याची संबंधित गिरणी कामगार/ वारस यांनी नोंद घ्यावी.

(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई